महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-०११९/प्र.क्र.७६/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २९ मे २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील पोलीस उपनिरीक्षक सेवा निवासस्थाने, बोरीवली (पश्चिम), येथे *"Providing Electrical Installation"* हे विद्युतविषयक काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/ कक्ष-८(११)/ ८५/ नि./ १/ शा.८२/ २०१९, दिनांक ०८.०३.२०१९.

ज्ञापन.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाने पोलीस उपनिरीक्षक सेवा निवासस्थाने, बोरीवली (पश्चिम), येथे *"Providing Electrical Installation"* हे विद्युतविषयक काम करण्यासाठी रु.९,२४,८५६/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उप अभियंता, अंधेरी विद्युत (सा.बां.) उप विभाग, मुंबई, यांनी सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत (सा.बां.) विभाग, मुंबई, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले असून त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस उपनिरीक्षक सेवा निवासस्थाने, बोरीवली (पश्चिम), येथे *"Providing Electrical Installation"* हे विद्युतविषयक काम करण्यासाठी रु.९,२४,८५६/- *(रुपये नऊ लक्ष चोवीस हजार आठशे छपन्न फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

1) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू नये;
2) खर्चाचे अंदाज हे पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई, यांनी साक्षांकित करावे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६१/२०१९/इमा.-२, दिनांक ०२.०४.२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०५२९१५४२४२६३२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.05.29 15:46:18 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत (सा.बां.) विभाग, मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).